**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक ०४.०७.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १९ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकास योजने अंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत. सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष (२२१७०९१३) खाली रक्कम रुपये ५.०० कोटी

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.६७(२)/न.वि.-१६;
दिनांक ३० मार्च २०२२

**ठराव क्रमांक १९ :-** संदर्भीय शासन निर्णयान्वये मधील मुद्दा क्रमांक २ मध्ये सदर प्रकल्पा अंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका राहिल असे नमुद केलेले आहे.

मुद्दा क्रमांक ३ प्रकल्प खर्चाचा ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाच्या व २५ टक्के हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे असे नमुद केले आहे. संदर्भीय शासन निर्णयामध्ये सोबत विवरण पत्र जोडलेले आहे. त्यामध्ये एकंदर ३५ कामांची यादी जोडलेली आहे. या शासन निर्णयानुसार रक्कम रुपये ५०० लक्ष सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) अंतर्गत प्राप्त झालेले आहे. सदर निधी महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त झाला आहे.

शासन निर्णय नगरविकास विभाग, १२ डिसेंबर, २०१७ मधील ४ (ड) नुसार १००% अनुदान अपवादात्मक परिस्थिती उर्वरित २५% निधी शासनाकडे मागणी करण्यासाठी व शासन निर्णय सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आलेले आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **स्वा/-** | **स्वा/-** |
| **नगरसचिव,** | **प्रशासक,** |
| **महानगरपालिका,अमरावती** | **महानगरपालिका,अमरावती** |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.